# महाराणी येसुबाई

अनंत तिबिले

रिया पब्लिकेशन्स्

**महाराणी येसुबाई : अनंत तिबिले**

**© शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये २५०/-

# महाराणी येसुबाई

# एक

मानाजी अनुज्ञा घेऊनच आत आला; पण तो अवेळी आल्याने पिलाजीरावांना त्याचे आश्चर्य वाटले. त्यांनी मानाजीच्या मुजऱ्याचा स्वीकार करीत पुसले, 'मानाजी, इतक्या राती? एखादं निकडीचं काम तर घेऊन आला नाहीस ना तू?'

'काम निकडीचं हाय जी!... तुमच्यासाटनं बुलावा घेऊन आलोया.' मानाजी अदबीनं म्हणाला. पिलाजीराव हसले. म्हणाले, 'पण कुणाचा बुलावा ते सांगितलं नाहीस...'

'कुणाचा म्हंजे, महाराजांचा!... महालाकडं जाण्याआधी आम्हाला भेटून जावा असं म्हणाले महाराज...' मानाजीने स्पष्टीकरण केले आणि इतक्या रात्री महाराजांनी इतक्या निकडीचा बुलावा का धाडावा हेच पिलाजीरावांना कळेना. ते काहीसे गंभीर झाले. त्यांनी मानेनेच मानाजीला निघून जाण्याची आज्ञा केली. मानाजी अदबीनं तसाच काही पावलं मागं सरकला आणि पुन्हा एकदा पिलाजीरावांना मुजरा करून निघून गेला.

पिलाजीराव काहीसे सचिंत झाले. महाराजांनी का बोलवावं याचा विचार करीत त्यांनी चार-दोन येरझाऱ्याही घातल्या. पण जसा गुंता लवकर सुटण्याची चिन्हे दिसेनात तसे ते चटकन माघारी वळले आणि मग महाराजांच्या महालाच्या दिशेने झपाझप पावलं टाकू लागले.

महाराजांच्या महालापाशी येताच त्यांनी पहारेकऱ्यांकरवी आपण आल्याची वर्दी आत पोहोचविली आणि अनुज्ञा पावताच ते महालाच्या दरवाजातून आत गेले.

महाराज आपल्याच मंचकावर काहीसे रेलून बसले होते. पिलाजीरावांनी कमरेत वाकून अदबीनं त्यांना मुजरा केला तसे महाराज हसले. मृदू-मधुर स्वरात म्हणाले, 'या या पिलाजीराव, या असे आणि आमच्या सामनेच बसा. आम्ही तुमच्याच तर प्रतीक्षेत होतो...'

महाराजांच्या समाधानी मुद्रेकडे लक्ष जाताच पिलाजीरावांना काहीसा धीर आला होता. त्यातच त्यांच्या मृदू-मधाळ शब्दांनी भर घातली होती. हे हसले होते आणि पुढं सरून तितक्याच अदबीनं उत्तरले होते, 'महाराज, आता आपला बुलावा मानाजीनं आमच्या कानावर घातला अन् आम्ही तुरंतच निघालो...'

'तुम्ही लगेचच याल याबद्दल आम्हाला बिलकुल शक नव्हता. पिलाजीराव या... प्रथम असे आमच्या सामने बसा. मगच आपण आपल्या मकसदीचं बोलू...'

पिलाजीराव पुढं झाले. महाराजांच्या समोरच असलेल्या एका आसनावर महाराजांच्या अनुज्ञेनेचे विराजमान झाले. मात्र, तरीसुद्धा त्यांच्या बसण्यात एक अदब होती. काहीसा संकोच होता. शिवाय त्यांची गर्दनही झुकलेली होती.

'पिलाजीरावऽऽऽ' क्षणभराने महाराजांनीच हाक मारली. पिलाजीरावांची गरदन वर झाली. क्षणभरच नजरेत नजर मिसळली. महाराजांच्या नजरेतील प्रसन्नता पाहून पिलाजीरावही तृप्त झाले. अदबीनं उत्तरले, 'जी महाराज?'

'पिलाजीराव, तसं पाहिलं तर श्रींच्या इच्छेनं आणि माँसाहेबांच्या आशीर्वादानं आम्ही दौलत संपादिली. त्यातच आई भवानी आणि जगदीश्वराचा वरदहस्त लाभला आम्हाला. साहजिकच दौलत उभी करण्याच्या मार्गात जी संकटं आली ती साफ कोलमडली आणि एक सुरम्य स्वप्न साकार झालं...'

'महाराजांचं बोलणं उचितच आहे...' नकळत पिलाजीरावांनी दुजोरा दिला. तसे महाराज हसले. पिलाजीरावांकडे रोखून पाहात म्हणाले, 'हे जरी खरं असलं पिलाजीराव, तरी रयतेची निष्ठा आणि आमच्या सवंगड्यांची कर्तबगारी आमच्या



पाठीशी नसती, तर आज आकारास आलेलं हे सुरम्य स्वप्न साकार झालं असतं की नाही, याबद्दल आजही आम्ही साशंक आहोत...'

'महाराजांची शंका रास्त आहे. नाही तरी सेनापतीचं बळ त्याच्या पाठीशी असलेल्या सैन्यबळावर अवलंबून नसतंच मुळी. ते अवलंबून असतं सैन्याच्या आपल्या सेनानायकावरच्या निष्ठेवर!... पण तरीसुद्धा महाराज, ही निष्ठा कर्तबगार शिलेदारांशिवाय दुसऱ्या कुणाच्याच वाट्याला येत नाही. महाराजांनी हिंदवी सुराज्याचं स्वप्न जे साकार केलं त्या कामी रयतेची निष्ठा जरी उपयुक्त ठरली असली तरी स्वत: राजांची कर्तबगारीही निमित्त झाली आहे, हे नाहीतरी कुणालाच अमान्य करता येणार नाही...' पिलाजीराव त्याच अदबीने, तितक्याच मृदू स्वरात म्हणाले.

महाराज आता मात्र दिलखुलासपणे हसले. म्हणाले, 'पिलाजीराव, अगदी अचूक बोलतात. आम्ही नाहीतरी तुमच्याकडून याच जबाबाची अपेक्षा केली होती.'

महाराज क्षणभरच इथं थांबले. काहीसे गंभीर झाले आणि समोरच्या खिडकीतून दूरवर पाहात स्वत:शीच पुटपुटल्यासारखे म्हणाले,

'सुराज्य संस्थापनेचा ज्या वख्ती आम्ही संकल्प केला त्या वख्ती अगदी हाच विचार आमच्या डोक्यात आला होता. आदिलशाही, कुतुबशाही वा मोगलशाही काय; या साऱ्या शाह्या दिसायला जरी मोठ्या असल्या तरी यांच्या पदरी असलेलं सैन्य केवळ वतनासाठी राबतं, जहागिरीच्या लालसेनं या शाह्यांची पाठराखण करतं आणि इनामाच्या मोहात सापडून आपण या शाह्यांचे पाईक आहोत असं म्हणतं, तेही केवळ प्रसंगोपात हे आम्ही अचूक हेरलं.

आदिलशाहीतला एखादा मातब्बर सरदार कुतुबशाहीचं वर्चस्व वाढलं आहे याची जाणीव होताच कुतुबशाहीची गुलामी राजीखुशीनं पत्करतो या मागचं इंगित आम्ही अचूक जाणलं आणि यामागं आपल्या स्वामीबद्दलची निष्ठा नसून इनाम-जहागिरी किंवा वतनाचा लोभ अधिक आहे, हे ज्यावेळी आम्हाला कळलं त्यावेळी आपलं स्वप्न साकार होणं फारशी अवघड समस्या नाही याची जाणीव झाली आम्हाला आणि म्हणूनच तर आम्ही स्वत: छोटे असूनदेखील या प्रचंड आणि मातब्बर शाह्यांविरुद्ध बंडाचा झेंडा उभा केला आणि संकल्प पुरा केला, तो संकल्पावर निष्ठा असणाऱ्या सवंगड्यांना जोडून!

पिलाजीराव, आम्ही जाणतो, आमची दौलत तशी पाहता विस्तारानं लहान आहे; पण आमच्या दौलतीवरची निष्ठा नक्कीच इतर कोणत्याही शाहीपेक्षा उदंड आहे आणि म्हणूनच तर आम्हाला त्याबद्दल अभिमान वाटतो...'

'महाराज, कुणालाही हेवा वाटण्यासारखीच तर ही निष्ठा आहे. कुणीही मोहित व्हावं अशीच तर ही श्रद्धा आहे.' पिलाजीराव नकळतच उद्गारले आणि महाराज भान विसरून म्हणाले, 'म्हणूनच तर पिलाजीराव, या निष्ठेला-या श्रद्धांना आम्ही अशा एखाद्या बंधनात बांधू पाहात आहोत की, या निष्ठेची आणि आमची कधीच आणि कोणत्याही हालतीत फारकत होऊ नये...'

महाराजांना नेमकं काय म्हणायचं आहे हे पिलाजीरावांना उमगलंच नाही आणि म्हणूनच तर काहीशा संभ्रमावस्थेतच; पण तितक्याच अदबीनं ते महाराजांना म्हणाले, 'महाराज, मतलब ध्यानी आला नाही आमच्या..'

'तोच तर समजावून देण्याच्या हेतूनं आम्ही तुम्हाला इतक्या रात्री बोलावलं आहे...' महाराज चटकन बोलून गेले आणि मग का कुणास ठाऊक ते थांबले. काहीसे गंभीर बनले. क्षणभर स्वत:च्याच विचारात गुरफटून गेले.

पण हे सारं क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी त्यांनी आपल्या मुद्रेवरील गांभीर्याच्या छटा आपल्या नेहमीच्याच प्रसन्न हास्यात बुडवून टाकल्या आणि ते त्याच मृदू-मधुर स्वरात म्हणाले, 'पिलाजीराव, तुम्ही जाणताच, ही दौलत तशी पाहता या मराठी रयतेची. स्वामी म्हणून दौलतीवर तसा रयतेचाच अधिकार. रयतेनं तिच्या हिफाजतीची जिम्मेदारी तुमच्या-आमच्यासारख्यांवर विश्वासानं टाकलेली. मग दौलतीची हिफाजत हे जसं तुमचं-आमचं कर्तव्य तसंच तुमच्या-आमच्यातले संबंध दृढ करणं- या संबंधातला एकोपा अधिक वाढविणं हेही तुमचं-आमचं कर्तव्यच नाही का?'

'अलबत् महाराज, अलबत्!' पिलाजीराव उत्साहानं उद्गारले तसे महाराज पुन्हा एकदा प्रसन्नपणे हसले आणि मग सहजगत्या म्हणाले, 'पिलाजीराव, आज आम्ही आमच्या महालातून बाहेर पडत असताना एक मुलगी पाहिली... फार तर दीड-दोन वर्षांची उमर असेल तिची. गौर वर्ण; काहीसा नाजूक देह, उभट चेहऱ्यावरची उठावदार, सरळ नासिका आणि काळेभोर किंचित मोठे डोळे...'

'महाराज, आपण पाहिलेली मुलगी कदाचित् आमची कन्या-राजस असावी...'



'अगदी बरोबर पिलाजीराव!... आम्ही दासीजवळ चौकशी केली तिची. ती आपली कन्या आहे हे ऐकून आम्हाला खूपच समाधान वाटलं. पिलाजीराव, तुमची राजस खरंच सुंदर आहे...'

महाराज थांबले. क्षणभर एकटक पिलाजीरावांच्या मुखाकडे पाहात राहिले. पण पिलाजीरावांची गरदन झुकलेली होती. शिवाय त्यांनी मुखातून एखाद-दुसराही शब्द बाहेर काढला नव्हता. ते तसेच बसून होते. काहीसे संकोचून-अदब राखून. महाराजांनाच राहवले नाही. त्यांनी हाक मारली, 'पिलाजीरावऽऽऽ'

'जी महाराज?'

'आम्ही मघासच बोललो तुम्हाला... तुमच्या-आमच्यातला एकोपा दृढ-अधिक दृढ झाला तर दौलतीची हिफाजत करणं अधिक आसान काम बनेल म्हणूनच तर आज आम्ही तुमच्यासमोर एक प्रस्ताव पेश करतो आहोत...'

'बोला महाराज, हवं ते बोला. महाराजांचा प्रस्तावच काय; महाराजांच्या मुखातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द आम्हाला प्राणमोलाचा आहे. आम्ही आमच्या जिवाची बाजी लावून त्याला जतन करू...' हे बोलत असताना पिलाजीरावांची मुद्रा अधिक निश्चयी दिसत होती.

महाराज समाधान पावले. खुशीनं हसले आणि मग बसल्या जागेवरून उठून पिलाजीरावांच्या समोर पोहोचले आणि मग आपले दोन्ही हात पुढे करीत म्हणाले, 'पिलाजीराव, तसं आम्हाला वचन द्या.'

'दिलं महाराज. वचन दिलं!' पिलाजीरावही चटकन उठून महाराजांच्या हातात हात देत तितक्याच निर्धाराने उत्तरले. महाराज पिलाजीरावांचा हा निर्धार पाहून काहीसे चकित तर झालेच शिवाय पिलाजीरावांबद्दलच्या अभिमानाने त्यांचा ऊर भरून आला. ते नकळतच बोलून गेले,

'पिलाजीराव, तुम्ही आम्हाला नाराज करणार नाही याबद्दल यकीन होता. तुम्ही आमचा प्रस्ताव मंजूर कराल, याबद्दलही आम्हाला शक नव्हता. पिलाजीराव, तुम्ही जाणताच. आमचे चिरंजीव शंभूराजांची उमर फार तर साडेचार-पाच सालांची असेल. आम्ही तुमच्या राजसला पाहिलं आणि तत्काळ शंभूराजे आमच्यासमोर उभे राहिले. आम्हाला हा जोडा लक्ष्मी-नारायणासारखा वाटला पिलाजीराव. म्हणूनच तर आम्ही आमच्या शंभूराजांच्या लग्नाचा संकल्प सोडून आपल्या राजससाठी प्रस्ताव पुढं केला आहे...'

पिलाजीराव चकितच झाले. त्यांना नकळतच त्यांचे नेत्र विस्फारले. त्यांनी महाराजांकडून या असल्या प्रस्तावाची स्वप्नातही अपेक्षा केलेली नव्हती आणि म्हणूनच तर त्यांच्या मुखातून धड शब्दही बाहेर पडू शकले नव्हते. ते केवळ एवढंच बोलू शकले होते, 'पण महाराज...'

महाराजांनी तत्काळ पुसलं, 'पण काय पिलाजीराव? हा प्रस्ताव तुम्हाला मंजूर नाही का? तसं असेल तर कोणत्याही प्रकारचा आडपडदा न ठेवता तुम्ही आम्हाला तसं सांगा... आम्ही तुमच्या मर्जीविरुद्ध काहीएक करणार नाही...'

पिलाजीराव अजूनही आपल्याला बसलेल्या आश्चर्याच्या धक्क्यातून स्वत:ला सावरू शकलेले नव्हते. शिवाय त्यातच महाराजांचा आपल्याबद्दल काहीतरी गैरसमज होतो आहे हे पाहून भलते हादरलेही होते. आश्चर्य आणि भय; शिवाय जोडीला अत्यानंद या विविध भावनांच्या गदारोळात सापडल्यामुळं नेमकं काय बोलावं हेच मुळी त्यांना समजेनासं झालं होतं.

एरव्ही शत्रुपक्षाशी दोन हात करण्यात माघार न घेता सपासप वार करणारे पिलाजीराव शिर्के बोलण्याच्या बाबतीत खरंच नामोहरम झाले होते आणि महाराज पुसतच होते,

'पिलाजीराव, असे अडखळू नका. आमचा प्रस्ताव तुम्हाला नामंजूर असेल, तर तसं साफ साफ सांगा आम्हाला. आम्ही खचितच ते मनावर घेणार नाही.'

आता मात्र पिलाजीरावांना तोंड उघडणंच भाग होतं. नियतीनं त्यांना बहाल केलेली ही सुवर्णसंधी आपल्या मुखदुर्बलतेने हातची जाते काय असं त्यांना भयही वाटू लागलं होतं आणि म्हणूनच त्यांनी बोलायला सुरुवात केली होती. ते म्हणाले होते, 'पण महाराज...! महाराज, हे सारं खरं ना?'

महाराज हसले. पिलाजीरावांच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवून आणि पिलाजीरावांवर नजर रोखून त्याच संथ, शांत स्वरात म्हणाले, 'आम्ही मजाक करतो आहोत असं का तुम्हाला वाटतं? नाही पिलाजीराव, नाही ! आम्ही सत्य तेच विचारतो आहोत तुम्हाला. बोला, आमच्याशी सोयरीक पसंत आहे तुम्हाला?'

'पण महाराज, आपण कुठे आणि आम्ही...'

'पिलाजीराव, आज आम्ही जेते आहोत हे मान्य आहे आम्हाला! पण हे जेतेपद दौलतीच्या हितापायीच आम्ही स्वीकारलेलं आहे. शृंगारपूर मराठी दौलतीचाच एक भाग; दुर्दैवानं तो यवनाकडे होता; आम्हाला पसंत नव्हतं ते आणि



म्हणूनच तर अगदी मजबुरीनं आम्ही शृंगारपुराची मोहीम आखली. तुम्हालाही वस्तुस्थितीची जाणीव झाली आणि दौलतीचा तुकडा दौलतीत सामावला गेला पण हे सारं कालचं झालं. आज साराच नूर बदलला आहे पिलाजीराव! काळाच्या ओघात आपण दोघेही मराठी दौलतीचे पाईक म्हणूनच तर आज समोरासमोर उभे राहिलो आहोत. शिवाय दौलतीवरील आम्हा दोघांचीही निष्ठा अभंग राहावी, एवढंच नव्हे तर ती अधिक भक्कम व्हावी म्हणूनच तर हा सोयरिकीचा घाट आम्ही जुळवून आणला आहे...'

'पण महाराज...' महाराजांना पुरतं बोलूही न देता पिलाजीराव उद्‌गारले आणि पुढं म्हणाले, 'काजवा प्रकाश देतो म्हणून काही त्याने सूर्याची बरोबरी करावयाची नसते. काजव्यानं तसं करणं म्हणजे आख्ख्या दुनियेकडून स्वत:चा मजाक उडवून घ्यायचा, असंच नाही का? भोसले स्वत:ला दौलतीचे पाईक म्हणवून घेत असतील कदाचित! हा त्यांच्या मनाचा मोठेपणा झाला. पण रयत भोसल्यांना दौलतीचे स्वामी समजते. त्याच श्रद्धेनं त्यांच्याकडे पाहते पण शिर्के... शिर्के तर कालपर्यंत यवनांचे चाकर होते. आज कदाचित भोसल्यांच्या कृपेनं त्यांना मराठी दौलतीचा पाईक म्हणवून घेण्याचा मान मिळालाही असेल; पण म्हणून का त्यांनी भोसल्यांशी बरोबरी करावी? महाराज, वळचणीचं पाणी आढ्यावरून वाहणं कदापि तरी शक्य आहे का?'

'पिलाजीराव', महाराज हलक्या हातांनी पिलाजीरावांच्या खांद्यावर थोपटत बोलू लागले, 'शिर्क्यांना आम्ही कधीच कमी लेखले नाही. शिर्क्यांचा अवमान आम्ही कधीच केला नाही. शिर्क्यांना आम्ही बरोबरीनं वागविण्यास नेहमीच उत्सुक होतो... कालपर्यंत पण काळानंच तो घाट जमवून दिला नाही. पण आज... आज तो अनमोल मोका दिला आहे आम्हाला. आणि हा मोका हातचा जाऊ द्यायला आम्ही खचितच तयार नाही. म्हणूनच म्हणतो पिलाजीराव, आता देरी करू नका. आमचा प्रस्ताव तुम्हाला मंजूर आहे की नाही ते बोला. आम्ही तुमची इच्छा जाणून घ्यायला उत्सुक आहोत.'

आता मात्र पिलाजीरावांची खात्रीच झाली. महाराजांच्या थोर मनाच्या दर्शनाने त्यांचा ऊर भरून आला. कंठ रुद्ध झाला. ते म्हणाले, 'आम्ही फक्त ऐकून होतो. पण आज भोसल्यांनी शिर्क्यांचं सोनं करायचं बोलून दाखविलं आणि आम्ही धन्य झालो. महाराज, आम्ही आपल्याला प्रथमच सांगितलं होतं, आपला शब्द आम्हाला आमच्या प्राणाहून प्रिय आहे. आपण सोयरिकीचा प्रस्ताव मांडून आम्हाला लाजवीत

आहात महाराज! एका काळ्याकभिन्न पत्थराला देवत्व बहाल केलं आहात महाराज. आम्ही हा मौका कसा सोडू?'

'याचा अर्थ आमचा प्रस्ताव आपल्याला मंजूर आहे तर?'

'होय महाराज, होय. आम्हाला सारं काही मान्य आहे.'

'मग पिलाजीराव, आम्ही याबद्दलची पुढची बोलणी करण्यासाठी तुम्हाला लवकरच पाचारण करू.'

'आणि आम्ही आपली आज्ञा प्रमाण मांडून तुरंत निघू. महाराजांनी याबाबत निश्चिंत असावं.' पिलाजीराव उद्गारले आणि बैठक मोडली. निरोपाचे विडे घेऊन आणि अतीव समाधान पावून पिलाजीराव महाराजांच्या महालातून बाहेर पडले.

दुसऱ्या दिवशी शृंगारपुराहून कूच करताना आणि पिलाजीरावांचा निरोप घेताना महाराज कालच्या रात्रीची याद देत पिलाजीरावांना म्हणाले,

'पिलाजीराव, तुम्हीही आमच्या पाठोपाठ निघायचीच तयारी करा. गडावर पोहोचताच आम्ही माँसाहेबांची अनुज्ञा मिळविणार आहोत आणि आम्हाला यकीन आहे, मांसाहेब आमचा प्रस्ताव नक्कीच मान्य करतील. पिलाजीराव, या गोष्टीला फारसा अवधी लागायचा नाही. मात्र, तुम्ही देरी करू नका. आम्हाला शंभूराजांचा विवाहसोहळा लवकरात लवकर पार पाडावयाचा आहे.'

'जशी आज्ञा महाराज...' पिलाजीराव उद्गारले. त्यांनी महाराजांना मुजराही केला आणि महाराजांनी घोड्याला टाच दिली.

महाराज राजगडाच्या दिशेने दौडत होते; पण त्यांचं मन पार मागे शृंगारपुरीत राहिले होते. पिलाजीरावांची कन्या राजसभोवतीच घोटाळू लागले होते. तिचे काळेभोर डोळे, काहीसा उभट चेहरा, सरळ धारदार नासिका आणि गौर, नाजूक अंग त्यांना खूप खूप, खूपच आवडले होते. शंभूराजांना राजस म्हणजे हिऱ्याला सोन्याच्या कोंदणाची उचित साथ होती आणि म्हणूनच तर ते केवळ शरीरानं राजगडाकडे चालले होते.

महाराज राजगडावर पोहोचल्याचे त्यांना देण्यात आलेल्या एकवीस तोफांच्या सलामीनेच जाहीर केलं. सनई-चौघड्यांनी सूर धरला. तुताऱ्या निनादल्या, विजयी वीरांचं स्वागत नित्याच्या उचित शिरस्त्याप्रमाणं घडलं. खुद्द जिजाऊ साहेबांनीच त्यांना ओवाळलं.

नित्याप्रमाणेच महाराज माँसाहेबांच्या महालात आले.



तिन्हीसांजेची वेळ; पण महाल दीपज्योतींनी उजळला होता. माँसाहेब नित्याप्रमाणेच आपल्या महालातील आई जगदंबेच्या मूर्तीसमोर हात जोडून बसल्या होत्या. त्यांच्या शेजारीच शंभूराजेही आपले इवले इवले हात जोडून गंभीर नजरेने एकटक आई भवानीकडे पाहात बसून होते. आई भवानीसमोर जळणाऱ्या समयांचा मंद मधुर प्रकाश माँसाहेबांच्या मुखावर पडल्याने माँसाहेबांची मुद्राही काहीशी उजळली होती, तीवर प्रसन्नता विलसत होती.

महाराज थेट माँसाहेबांच्या मागे जाऊन उभे राहिले. त्यांनीही हात जोडले. डोळे मिटून घेऊन आई भवानीला नमस्कार केला आणि त्याचवेळी त्यांच्या कानावर हाक आली, 'शिवबाऽऽ'

'जी माँसाहेब?'

'आमची पूजा आटोपलीच आहे. केवळ ओवाळणं संपलं की आम्ही आलोच. तोवर बसा तुम्ही मंचकावर.'

'जशी आज्ञा माँसाहेब.' आणि महाराज मागे परतले. थेट मंचकापाशी पोहोचले आणि विराजमान झाले.

अल्पावकाशातच माँसाहेबांचं आटोपलं. त्या उठल्या आणि शंभूराजांसह मंचकावर येऊन बसल्या. यावेळी महाराज अदबीनं मंचकाजवळ उभेच होते.

'बसा राजे...' माँसाहेबांनी अनुज्ञा दिली. महाराज बसले. माँसाहेबांनीच सुरुवात केली. त्या म्हणाल्या, 'राजे, पिलाजीराजे शिर्के काय म्हणतात?'

माँसाहेबांनी नेमका पिलाजीराजांचा विषय काढलेला पाहून महाराजांना आश्चर्य वाटले. पण शिवाय त्यांना या गोष्टीचा आनंदही झाला. ते खुशीत येऊनच म्हणाले,

'माँसाहेब, पिलाजीराजे तशी समजूतदार असामी. शिवाय शिर्के घराणं आपल्या तोलामोलाचं... भोसल्यांची दौलत उभी करण्याचा संकल्प साकार होईल की नाही याच संभ्रमात सापडून शिर्क्यांनी गनिमाशी सुलूख केलेला. मात्र दौलत साकार झालेली आहे असं पाहताच दौलतीबद्दल त्यांच्या मनात प्रेमही निर्माण झालेलं; पण उघड उघड यवनांशी द्रोह करून दौलतीत सामावून जाण्याचं साहस त्यांच्यापाशी नसलेलं...'

'साहजिकच आहे राजे...' मध्येच माँसाहेबांनी बोलायला सुरुवात केली. त्या पुढं म्हणाल्या, 'दौलत उभी राहिली तरी तिच्या बळाला थिटं समजणारे शिर्के वतनासाठीच तर दौलतीत मिसळायला तयार नव्हते. यवन त्यांना मोठा वाटत होता.

त्यांच्या दृष्टीनं यवनांचं बळ दौलतीच्या मानानं मोठं होतं. म्हणूनच तर त्यांना यवनांचा रोष नको होता...'

'हे जरी खरं असलं माँसाहेब, तरी शृंगारपुराने आम्हाला फारशी तोशीस लागू दिली नाही. शृंगारपूर सुराज्यात सामील करून घेण्यासाठी आम्हाला फारशी कोशीशही करावी लागली नाही. पिलाजीरावांनी मराठी दौलतीचं वर्चस्व समजूतदारपणानं मंजूर केलं...'

महाराजांनी माहिती दिली तशा माँसाहेब हसल्या. म्हणाल्या, 'राजे, वतनासाठी इमान विकणारी माणसं, इमानी नसतातच मुळी!... वतन धोक्यात येताच दिलेलं इमान पुन्हा पायाखाली चिरडून टाकायलाही ती मागंपुढं पाहात नाहीत. देश-धर्म आदींचा विचारही न करता सारी हयात यवनांच्या सेवेत रुजू घातलेली माणसं उद्या बिकट समयी तुमच्या मागे उभी राहतील यावर यकीन करू नका राजे!... तसं केलंत तर तो आत्मघात ठरेल!' यावेळी माँसाहेबांचा स्वर निश्चयी बनला होता. शिवाय त्या गंभीरही बनल्या होत्या.

महाराज क्षणभरच अडखळले; पण दुसऱ्याच क्षणी त्यांनीही स्वत:ला सावरले. स्वरातली अदब कायम ठेवीत ते म्हणाले, 'माँसाहेब, वतनासाठी इमान विकणारी माणसं वतनासाठी बेईमान होतात हे आम्हीही आतापर्यंत बऱ्याच वेळा अनुभवलं आहे. आमच्याच देशातील अशी कितीतरी मातब्बर मराठी घराणी आहेत की, त्यांना स्वातंत्र्यापेक्षा वतन प्रिय आहे. सुराज्यापेक्षा जहागिरीचं मोल अधिक आहे. आम्ही अशा माणसांना जाणतो, ओळखतो माँसाहेब!

अशा माणसांची आम्ही नफरतही करतो. पण तरीसुद्धा ती मराठी माणसं आहेत. या देशातील माणसं आहेत हे मात्र आम्ही कधीच विसरत नाही. माँसाहेब, दौलत उभी राहिली एवढ्यानं आमची जिम्मेदारी संपत नाही. समर्थांनी सांगितल्याप्रमाणे 'मराठा तेतुका मेळवावा' हे तर आमचं यापुढचं स्वप्न आहे. समर्थांच्या या आज्ञेचा मान ठेवल्यानेच मराठा धर्म वाढेल, याबद्दल आमची खात्री आहे आणि म्हणूनच तर माँसाहेब, आम्ही आमच्याच या माणसांचा तिरस्कार करीत असताना ती आमची आहेत हे कदापि विसरू शकत नाही. उलट आज वतनासाठी सुराज्याशी फारकत घेतलेली माणसं सुराज्यात कशी सामील होतील याचाच तर आम्ही अधिक विचार करतो आहोत...'



महाराज भावनेच्या भरात बराच वेळपर्यंत एकटेच बोलले. बरंच काही बोलले. माँसाहेब त्यांच्या या बोलण्याने सुखावल्या. त्यांच्या मुखावरचं गांभीर्य प्रकाशगमनाबरोबर अंधार हटावा तसं हटलं. त्या हसत हसत म्हणाल्या,

'राजे, आम्ही तुमच्या विचारांची-भावनांची कदर करतो. दौलत वाढवायची असेल, ती बळकट करायची असेल, तर मराठा मेळवायला हवा हेही आम्ही मान्य करतो. पण या मराठा मेळविण्याच्या प्रयत्नात या मराठ्यांना वतन वा जहागिरीचा मोह दाखवून आत्मसात करण्याचा यत्न केलात तर मात्र तुमचा हा यत्न फोल असून, त्याने मराठा मेळविला तर जाणार नाही; उलट त्याला लोभी बनविलं जाईल हे मात्र आम्ही अगदी ठामपणे बजावतो आणि लोभी माणसाजवळ इमान असूच शकत नाही याचीही आम्ही तुम्हाला वेळीच जाणीव करून देतो...'

माँसाहेब थांबल्या. महाराजही क्षणभर काही बोलले नाहीत. माँसाहेबांनाच राहवले नाही. त्या म्हणाल्या, 'राजे, तुम्ही बोलत का नाही?'

'माँसाहेब...' महाराजांनी बोलायला सुरुवात केली. यावेळी त्यांचं लक्ष शंभूराजांवर स्थिर झालं होतं. शंभूराजेही त्यांच्याकडेच पाहात होते. ते पुढे म्हणाले, 'पिलाजीरावांची निष्ठा दौलतीमागे अभंग राहण्यासाठी आम्ही एक नवा मार्ग चोखाळावा म्हणतो आहोत. अर्थात, त्याला आपली अनुज्ञा मिळाली तरच...'

'राजे, मार्ग सांगा; आम्हाला पसंत पडला तर आम्ही तुरंत त्याला अनुज्ञा देऊ.'

'माँसाहेब, शृंगारपुरातील मुक्कामात आम्ही पिलाजीरावांची कन्या राजस पाहिली. आम्हाला ती खूप आवडली...'

'काय उमर असेल तिची राजे?'

'फार तर दोन सालांची.'

'राजे, जरा स्पष्ट बोला. तुमचा मनसुबा आमच्या ध्यानी आला नाही.'

'माँसाहेब, आपली अनुज्ञा असेल तर... तर आमच्या शंभूराजांसाठी आम्ही पिलाजीरावांची राजस...'

आणि महाराज अडखळले... त्यांना पुढं काही बोलण्याचा धीरच झाला नाही. एवढंच नव्हे, तर गरदन वर करून माँसाहेबांच्या नजरेला नजर देण्याचं साहसही त्यांच्याकडून केलं गेलं नाही.

माँसाहेब हसल्या. शंभूराजांच्या मस्तकाला हळुवारपणे कुरवाळीत त्या अगदी स्पष्ट शब्दांत म्हणाल्या, 'राजे, आम्हाला वाटतं याबाबत तुम्ही पिलाजीरावांशी बातचीतही केली असावी...'

'गलती माफ करा माँसाहेब; पण आम्ही राजसला पाहिली आणि आम्ही स्वत:ला आवरूच शकलो नाही.' महाराजांनी कबुली दिली. माँसाहेब काहीशा अधीर बनल्या. त्यांनी पुसले, 'इतकी का सुंदर आहे राजस?'

महाराजही खुशीत आले. त्यांचं भयही थोडं कमी झालं. माँसाहेब गुस्सा होण्याऐवजी समाधान पावल्या आहेत असं पाहताच ते म्हणाले, 'माँसाहेब, आमच्या जागी तुम्ही असता, तर तुमचीही गत आमच्यासारखीच झाली असती...'

'याचा अर्थ राजस खरंच सुंदर असावी...'

'खूपच सुंदर! शिवाय आतापासूनच तडफदार दिसते ती... माँसाहेब, आमच्या काहीशा उग्र-प्रकृती संभाजीराजांना राजससारखीच तडफदार पत्नी हवी...'

'मग राजे, विलंब करू नका. पिलाजीरावांना तातडीचं बोलावणं धाडा. असाल तसे निघा. पानावर बसला असाल तर हात धुवायला इकडेच निघून या, अशी आज्ञा धाडा. कारण शंभूराजांच्या विवाह-सोहळ्यात आम्हालाही मिरवायची घाई झाली आहे. मग धाडता ना बुलावा?'

'जशी आज्ञा माँसाहेब...' आणि महाराज उठले. त्यांनी माँसाहेबांना मुजरा केला आणि ते तसेच मागे सरकले. महाराज महालातून केव्हा निघून गेले हेही माँसाहेबांना समजले नाही. कारण त्या शंभूराजांनाच कुरवाळण्यात मश्गुल होत्या...

◆◆



# दोन

माँसाहेब संतापल्या होत्या. क्रोधाने लालेलाल झाल्या होत्या. त्यांच्या नेत्रकडाही त्यांना नकळतच लालसर बनल्या होत्या. त्यांची बेचैनी त्यांच्या मुद्रेवर अगदी स्पष्टपणे प्रतीत होऊ लागली होती. त्या आपल्या महालात होत्या; पण तरीही त्यांच्या चित्ताला स्वस्थता लाभत नव्हती. आज अगदी पहिल्यांदाच आई जगदंबेच्या पूजेतही त्यांचं म्हणावं तसं चित्त लागलं नव्हतं.

आणि म्हणूनच तर त्यांनी पूजा आटोपताच महाराजांना बुलावा धाडला होता... 'असाल तसे आमच्या महालात येऊन आम्हाला भेटा.' असा निकडीचा बुलावा घेऊन विश्वनाथच घाईघाईने महाराजांकडे गेला होता आणि माँसाहेब अस्वस्थ चित्ताने त्यांचीच तर वाट पाहात होत्या.

तसं पाहता रात्री आपल्या अनुपस्थितीत सदरेवर घडलेल्या साऱ्या गोष्टी अगदी सकाळीच त्यांच्या कानावर आल्या होत्या. विश्वनाथनेच तर त्या जशाच्या तशा माँसाहेबांच्या कानावर घातल्या होत्या...

मिर्झाराजे जयसिंग दक्षिणेत आले होते, ते दौलतीवरचं एक महान संकट बनूनच. स्वत: मिर्झाराजे जयसिंग शूर लढवय्ये होतेच; पण शिवाय त्यांच्यापाशी हजारोंचं सैन्य होतं. आलमगिरानं दौलत आपल्या स्वत:च्या घशात घालण्याच्या इराद्यानंच तर मिर्झाराजांसारख्या कुशल सेनापतीची दक्षिणेवर नेमणूक केली होती आणि मिर्झाराजांनी आपल्या हजारो सैनिकांसह घातलेला पुरंदरचा वेढा म्हणजे एक जबरदस्त अजगराचा विळखाच होता जणू.

अशा या कुशल सेनापतीच्या प्रचंड सैन्याशी आमने-सामने लढा देणं म्हणजे आपल्या तुटपुंज्या मावळ्या शिपायांसह अग्निकुंडात प्रवेश करण्यासारखंच आत्मघातकी होतं ते! आणि म्हणूनच काहीशा अस्वस्थ बनलेल्या महाराजांना माँसाहेबांनी विचारलं होतं, 'शिवबा, मिर्झाराजांबाबत कोणता विचार केला आहेस तू?'

'... माँसाहेब, काळ उलटला आहे. नियतीनं वैर साधलं आहे. संकेत आमचा दुश्मन बनून आमच्या सामने उभा ठाकला आहे!... आणि त्यामुळेच तर आम्ही अस्वस्थ बनलो आहोत. नेमकं काय करावं हेच तर मुळी आम्हाला समजेनासं झालं आहे...'

महाराज उत्तरले होते. तशा माँसाहेब गंभीर झाल्या होत्या. काहीशा कठोर आवाजात म्हणाल्या होत्या,

'राजे, काळ पाठीशी आल्यावर माणूस काहीही करू शकतो. नियती दोस्तीनं वागली तर माणूस सारं काही पावतो आणि संकेत हमेशा आपल्याच बाजूने कौल देऊ लागला की, माणसाला हवं ते साधणं आसान होतं. पण काळ, नियती आणि संकेत लहरी असतात. ते कधी दोस्तीचा हात पुढे करतात, तर कधी गनीम बनून माणसाचा पिछा करतात. हे असंच असतं. राजे, हे असंच असतं. दिवसाच्या उजेडात सचैल स्नान करणाऱ्या माणसानं अंधाराच्या बागुलबुवाच्या भयानं भिण्याची तयारी करायचीच असते. सुखाच्या सावलीनं तृप्त होणाऱ्या माणसानं दु:खाच्या उन्हातही जळायला उभं राहायलाच लागतं... राजे, युद्धाचा खेळ खेळण्यासाठी तर तुम्ही शिलेदार बनला आहात. हे स्वतंत्र राज्य संपादिलं आहात. दौलत उभी केली आहात. आता एकदा हा जीवघातकी खेळ खेळण्याची तयारी केल्यानंतर हमेशा विजयाचीच अपेक्षा का करावी माणसानं? एखाद दुसरा पराभव वाट्याला आल्यानं असं निष्क्रिय का बनावं?... सांगा राजे, सांगा, हे तुमच्यासारख्यानं विचारांच्याच गुंतावळ्यात गुंतून का पडावं?'



'माँसाहेब... माँसाहेब, आम्हाला हे का कळत नाही? हे का समजत नाही? विचारांच्या भोवऱ्यात सापडलेला माणूस निष्क्रिय तर बनतोच; पण त्याचबरोबर तो आपलं कर्तृत्वही विसरतो, याचा आम्हीही अनुभव घेतला आहे माँसाहेब आणि म्हणूनच तर आम्हाला वाटतं, ही विचारांची भुतावळ लाथेच्या ठोकरीनं दूर उडवावी आणि शिलेदाराला साजेल अशा आवेशानं हातात समशेर घेऊन दुश्मनावर तुटून पडावं... आणि...'

'आणि आपल्या विरुद्धच्या एका प्रचंड वन्हीत आपलं सर्वस्व जाळून टाकावं... आपलं वर्चस्व हरवून बसावं असंच ना?' माँसाहेबांनी तत्काळ पुसलं होतं आणि मग त्या पुढं म्हणाल्या होत्या,

'पण राजे, असं वागाल तर तो तुमचा आतताईपणा ठरेल... अविचार ठरेल. राजे, असं वागल्यानं कदाचित उद्या दुनिया तुमच्या साहसाचं कौतुक नक्कीच करेल; पण त्याचबरोबर तुमच्यावर अविवेकी म्हणून शिक्कामोर्तबही करेल. राजे, तुम्ही नुसते शिलेदार नाही, एक सेनानीही आहात आणि सेनानीच्या मनगटात जसं बळ असावं लागतं तद्वतच प्रबळ गनिमाशी दोन हात करताना सेनानीने आपल्या बळापेक्षा आपल्यातील मुत्सद्देगिरीचा वापर अधिक करावा...'

'माँसाहेब... माँसाहेब, तुम्हीही आमच्या अगदी दिलातलं बोललात. आमचा फैसला आपल्या मुखातून आम्हाला ऐकवलात!' महाराज चटकन उद्गारले. आता त्यांच्या मुखावरली अस्वस्थता संपली होती. ते काहीसे उत्साही दिसू लागले होते आणि त्याच उत्साहात पुढं म्हणाले होते,

'माँसाहेब, आमचा फैसला आपल्यापुढं कसा पेश करावा हाच आमच्या समोरचा फार मोठा सवाल होता. आम्ही त्यामुळेच तर काहीसे अस्वस्थ झालो होतो. पण आता...'

'पण राजे, तुम्ही तुमचा फैसला अजुनी आम्हाला ऐकवला नाहीत.'

'माँसाहेब, आम्ही मजबूर आहोत. मिर्झाराजांशी झगडा करून आम्हाला आमचं माणूसबळ गमवायचं नाही. त्यापेक्षा आम्ही त्यांच्याशी सुलूख करण्याचा मनसुबा रचला आहे...'

'पण सुलूख करायचा म्हणजे तुम्हाला काहीतरी सोडावं लागेल राजे; याचा तुम्ही विचार केला आहात ना?'